BSNL MOBILE
Vi India|Vodafone IN VoLTE 0.00K/s 68% 7:14

# कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक 1064

कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252

:: प्रेस नोट :: दिनांक :- 10.02.2021.

**पंचायत समिती घनसावंगी येथील तांत्रिक सहाय्यक श्री. रमेश अशोकराव बारगजे यास 5,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. रमेश अशोकराव बारगजे वय 31 वर्ष व्यवसाय नोकरी तांत्रिक सहाय्यक, पंचायत समिती, घनसावंगी जि जालना रा. बस स्टॅण्ड जवळ घनसावंगी जि जालना, मुळ रा. नरडगव्हाण ता शिरुर कासार जि बीड |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि. 10.02.2021 रोजी पंचायत समिती कार्यालय, घनसावंगी जि जालना येथे MRGS ऑफीसमध्ये |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 5,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दि. 09.02.2021 रोजी तक्रार दिली कि, त्यांचे गट क्रं 101 या शेत जमीनीमध्ये त्यांना शेत तळे करणे असल्याने व शेत तळे करणेसाठी शासनाकडुन अनुदान मिळत असल्याने त्यांनी शेत तळे अनुदान संबंधाने सर्व कागदपत्रे तयार करुन पंचायत समिती, घनसावंगी जि. जालना येथे दाखल केले असता तेथील तांत्रिक सहाय्यक श्री. रमेश बारगजे यांनी तक्रारादार यांचेकडे त्यांचे व इतर 6 लाभार्थी यांचे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर शेत तळ्यांचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी व आदेश आल्यावर हजेरी व मोजमाप पुस्तक देण्यासाठी 17,500/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास तांत्रिक सहाय्यक श्री. रमेश बारगजे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दिनांक 09.02.2021 रोजी लाच मागणी पडताळणी सापळा लावला असता, लोकसेवक श्री. रमेश बारगजे तांत्रिक सहाय्यक यांनी तक्रारदार व इतर 6 लाभार्थी यांचे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर शेत तळ्यांचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी व आदेश आल्यावर हजेरी व मोजमाप पुस्तक देण्यासाठी 17,500/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. त्यावरुन आज दि. 10.02.2021 रोजी पंचायत समिती, कार्यालय घनसावंगी जि जालना येथे तांत्रिक सहाय्यक श्री. रमेश बारगजे यांनी तक्रारदारास महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजुर शेत तळ्यांचा कार्यारंभ आदेश देण्यासाठी व आदेश आल्यावर हजेरी व मोजमाप पुस्तक देण्यासाठी तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष 5,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

लोकसेवक श्री. रमेश अशोकराव बारगजे वय 31 वर्ष व्यवसाय नोकरी तांत्रिक सहाय्यक, पंचायत समिती, घनसावंगी जि जालना रा. बस स्टॅण्डजवळ घनसावंगी जि जालना, मुळ रा.नरडगव्हाण ता शिरुर जि बीड यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो जालना यांचेकडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्तीमार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.

Share Favourite Edit Delete More